CMYK

१८ जिल्ह्यांसह राज्यभर अहिल्या भवन उभारण्याच्या कार्यवाहीस गती द्यावी - महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे >> पान 2

'म्हाडा'च्या माध्यमातून दोन वर्षात एक लाख घरे उभारणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे >> पान 3

शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे धडे >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**
ज्ञान हे वाचनाने मिळते, पण शहाणपण अनुभवाने येते.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



एका किसींग सीनसाठी ३७ रिटेक, Kiss करून करून थकला अभिनेता
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 169 ■ गुरूवार, दि. 30 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून वैद्यकीय सहाय्यता मिळविणे होणार अधिक सोपे

## आजारांचे पुनर्विलोकन, अर्थसहाय्याची नव्याने निश्चिती, रुग्णालय संलग्नीकरण निकष ठरविण्याकरिता समिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून वैद्यकीय सहाय्यता मिळण्याकरिता आजारांचे पुनर्विलोकन करणे, आजारांकरिता देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याची रक्कम नव्याने निश्र्चित करणे व रुग्णालय संलग्नीकरणासाठी निकष ठरविण्याकरिता शिफारशी करण्याबाबत समिती गठीत आली आहे. याबाबत शासननिर्णय काढण्यात आला असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली.**

या समितीमध्ये संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय (मुंबई) हे अध्यक्ष असतील. तसेच, आरोग्य संचालनालय (मुंबई) चे संचालक, आयुष संचालनालय (मुंबई) चे संचालक, सर ज.जी रुग्णालय समूहाचे अधिष्ठाता, लोकमान्य टिळक स्मारक रुग्णालय (सायन) चे अधिष्ठाता, मुख्यमंत्री यांचे सल्लागार डॉ. आनंद बंग, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय (मुंबई) चे माजी संचालक डॉ. प्रवीण शिनगारे, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय (मुंबई) यांचे माजी संचालक डॉ. तात्याराव लहाने, एशियन कॅन्सर इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. रमाकांत देशपांडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान ( छत्रपती संभाजीनगर) चे सचिव डॉ. अश्र्विनीकुमार तुपकरी, के.ई.एम रुग्णालय (मुंबई) चे माजी अधिष्ठाता डॉ. अविनाश सुपे, टाटा मेमोरियल सेंटर (परळ, मुंबई ) चे संचालक अकॅडमी डॉ. श्रीपाद बनावली, कौशल्य धर्मादाय रुग्णालय (ठाणे) चे संचालक डॉ. संजय ओक, बॉम्बे हॉस्पिटल ( मुंबई), नेफरोलॉजी विभागचे प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ. बिच्छू श्रीरंग, पी.डी. हिंदुजा रुग्णालय (मुंबई) चे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर डॉ. जॉय चक्रवर्ती, नायर हॉस्पिटल (मुंबई) मधील हृदयविकार विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. अजय चौरसिया, बॉम्बे हॉस्पिटल (मुंबई) च्या कन्सल्टंट फिजिशियन अँड इंटेसिविस्ट डॉ. गौतम भन्साळी, नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट (नागपूर) चे वैद्यकीय संचालक डॉ. आनंद पाठक, दीनानाथ मंगेशकर रुग्णालय (पुणे) यांच्या हॉस्पिटल मॅनेजमेंट कमिटीचे सचिव डॉ. माधव भट हे सदस्य म्हणून कार्यरत राहतील. तसेच, मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे कक्ष अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.



मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मदत मिळण्याकरिता सध्या अस्तित्वात असलेल्या २० आजारांपैकी इतर शासकीय योजनेत समाविष्ट असलेल्या आजारांचे पुनर्विलोकन करणे तसेच सहाय्यता मिळण्याकरिता नवीन आजार समाविष्ट करण्याबाबत शिफारस करणे, रस्ते अपघात वगळून इतर अपघात प्रकरणामध्ये घ्यावयाच्या कागदपत्रांची निश्र्चिती करणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मदत मिळण्याकरिता आजारांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यांच्या रकमांचे पुनर्विलोकन (समीक्षण) करुन अनुज्ञेय रक्कम (मंजूर रक्कम) नव्याने निर्धारीत करण्याची शिफारस करणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीकरिता रुग्णालय संलग्नीकरणासाठी (एारिपिश्रशव) रुग्णालयाच्या तपासणीचे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, केंद्र-राज्य सरकारच्या वैद्यकीय उपचाराबाबत असलेल्या इतर योजनांच्या धर्तीवर निकष ठरविणेबाबत शिफारस करणे याकरिता ही समिती गठीत करण्यात आल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख श्री. नाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाने वैद्यकीय उपचाराबाबत वेळोवेळी विविध विषयांच्या अनुषंगाने विचारणा केल्यास ही समिती त्या विषयांबाबत शिफारस सादर करेल.

## नाशिकमध्ये ७७६ गावांमध्ये भूजल पातळी खालावली, पाण्याच्या आणीबाणीची शक्यता, विहीर खोदण्यास बंदी

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील भूजल सर्वेक्षण विभागाच्या अहवालातून मोठी माहिती समोर येत आहे. नाशिक जिल्ह्यातील ७७६ गावांमध्ये विहीर खोदण्यास बंदी घालण्याचे निर्देश देण्यात आले आहे. नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक जास्त प्रमाणात शेती केल्या जाणाऱ्या येवला, निफाड, सिन्नर तालुक्यात भूजल पातळी गंभीररित्या खालवली असल्याचे दिसून येत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी आणि सिंचनासाठी पाण्याचा अति प्रमाणात उपसा होत असल्याने भूजल सर्वेक्षण यंत्रणेच्या माध्यमातून पाण्याची पातळी खालावली असल्याचे समोर आले आहे. ज्या गावांनी १०० टक्क्यांपेक्षा जास्त शोषण केले आहे त्यांना यापुढे विहीर खोदण्यास बंदी घालण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

नाशिक जिल्ह्यात भूजल सर्वेक्षण विभागाने केलेल्या पडताळणीतून मोठी माहिती समोर आली. यामध्ये नाशिक जिल्ह्यातील अनेक ठिकाणच्या तालुक्यांमध्ये पाण्याची पातळी खालावल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. नाशिक जिल्ह्यात सर्वात जास्त प्रमाणात शेती केली जाते आणि यामध्ये प्रामुख्याने कांदा, ऊस, गहू आणि द्राक्षे अशा फळबागांची देखील लागवड पाहायला मिळते.

## गणेश नाईकांच्या जनता दरबाराचे चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून समर्थन; तर ठाणे हा आमचाच बालेकिल्ला, शिवसेनेचे स्पष्टीकरण

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे जिल्ह्यात शिवसेनेला आव्हान देण्याची तयारी भाजपने केली आहे का?, असा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. कारण पालघरचे पालकमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते गणेश नाईक यांनी ठाण्यात देखील जनता दरबार घेणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळातून अनेक तर्क वितर्क लावले जात आहे. अशातच राज्याचे महसूलमंत्री आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या बाबत भाष्य करत शिवसेनेच्या सदस्यांनी देखील जनता दरबार घेतले पाहिजे. त्यामुळे लोकांचे प्रश्न सुटतील आणि जनतेचं भलं होईल, असे म्हणत गणेश नाईकांच्या जनता दरबाराचे चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून एकप्रकारे समर्थन करण्यात आले आहे.

## मुंबईत २२ कोटी रुपयांचे २.२ किलो कोकेन जप्त

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** डीआरआय म्हणजेच महसूल गुप्तचर संचालनालयाच्या मुंबई विभागाच्या अधिकाऱ्यांनी भारतात ड्रग्ज तस्करी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन युगांडाच्या नागरिकांना रोखले. तिघे संशयित युगांडा मधील एंटेब्बे इथून आलेल्या विमानाने मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आले होते. चौकशी केल्यानंतर, तिघांनीही तस्करीच्या उद्देशाने ड्रग्ज असलेले कॅप्सूल घेतल्याचे कबूल केले. संशयितांना दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले आणि न्यायालयाच्या आदेशानुसार, वैद्यकीय निरीक्षणासाठी जवळच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी संशयितांनी एकूण १७० कॅप्सूल पोटात घेतल्याचे समजले. यामध्ये एकूण २१९७ ग्रॅम कोकेन होते. या कोकेनचे मूल्य अंदाजे २१.९७ कोटी रुपये आहे. या प्रवाशांकडून अंमली पदार्थ नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस (एनडीपीएस) कायदा, १९८५ च्या तरतुदींनुसार कोकेन जप्त करण्यात आले. या तिघांना अटक करण्यात आली आणि एनडीपीएस कायद्याच्या तरतुदींनुसार त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आले. पुढील तपास सुरू आहे.

## देवेंद्र फडणवीसांचा बीड दौरा ठरला

## सुरेश धस यांच्या आष्टीत विकासकामांसाठी विशेष उपस्थिती!

**बीड/प्रतिनिधी :** संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी बीड जिल्हा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. याचदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बीड जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. भाजपचे आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघात विकासकामांच्या उद्धाटनासाठी देवेंद्र फडणवीस येणार आहेत.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पाच फेब्रुवारी रोजी बीड जिल्ह्याच्या दौरा करणार आहेत. भाजपा आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघातील कुंटेफळ तलावाच्या कामाच्या उद्धाटन प्रसंगी देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमानंतर देवेंद्र फडणवीस विविध विभागाचा आढावा घेणार आहेत. त्याचबरोबर मच्छिंद्रनाथ संस्थानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा होणार आहे.

अजित पवार उद्या बीड दौऱ्यावर-

उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या बीड दौऱ्यात पंकजा मुंडे देखील असणार सोबत असणार आहे. अजित पवार आणि पंकजा मुंडे आज एकाच विमानाने संभाजीनगरला पोहचणार आहेत. तसेच उद्या (३० जानेवारी) बीडच्या डीपीडीसी बैठकीत अजित पवारांसह पंकजा मुंडे देखील उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे बीडच्या डीपीडिसी बैठकीत मंत्री धनंजय मुंडे उपस्थित राहणार का?, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

सुरेश धस काय म्हणाले?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ५ तारखेला आष्टीत येतायत. मुख्यमंत्री कार्यक्रमासाठी मतदारसंघात येणार आहेत, असं सुरेश धस म्हणाले. बीड जिल्ह्यातील पोलीसांच्या बदल्या करा. तेथील पोलीसांची मटक्यावाल्यासोबत अर्धी पार्टनरशिप आहे, असा आरोप सुरेश धस यांनी केला. काही पोलीस एकाच एका ठिकाणी २०- २० वर्ष आहेत. याची माहिती मी मुख्यमंर्त्याना दिलीय. परळीतील अवैध राखेचे साठे आहेत याची यादी माझ्याकडे आहे, मी पोलीसांना देणार आहे. महादेव गित्ते हे मागचं प्रकरण आहे, वाल्मिक अण्णा हा एकच आहे. मागे दुसरा वाल्मिक अण्णा पोलीसांना दाखवला आहे.वाल्मिक अण्णा हा एकच आका आहे, आकाचा आका दुसरा आहे. कोण त्या महिल्या अधिकारी आहे, ज्यांना वाल्मिक अण्णांनी फोन केला होतो, याचा मिडीयाने तपास करावं. कृष्णा आंधळेच्या बाबतीत मी पोलीसांकडून माहिती घेतली. तो गरिब आहे, मात्र त्यावर अनेक गुन्हे आहेत. सौरभ भोंडवे नावाचा मुलगा आहे, त्याचे वडील माझ्याकडे आले होते, अशी माहिती देखील सुरेश धस यांनी दिली. दरम्यान, एका रस्त्याच्या कामासाठी ५-५ वेळा पैसे उचलले आहेत. परळीत रस्त्याची काम नाहीत. मात्र कोट्यावधी रुपये उचलली आहेत, असा दावाही सुरेश धस यांनी माध्यमांशी बोलताना केला.

## युवक काँग्रेसमध्ये काय चाललेय? आणखी चार पदाधिकारी निष्कासित

**नागपूर/प्रतिनिधी :** प्रदेश युवक काँग्रेसमध्ये अंतर्गत गटबाजी उफाळून आली आहे. प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत यांच्या कार्यपद्धतीवर उघड टीका करणाऱ्या चार पदाधिकाऱ्यांना संघटनेतून निष्कासित करण्यात आले आहे.युवक प्रदेश काँग्रेसने उपाध्यक्ष तनवीर अहमद, सरचिटणीस अनुराग भोयर, सचिव अक्षय हेटे आणि नागपूर ग्रामीणचे अध्यक्ष मिथिलेश कन्हेरे यांना बुधवारी तात्काळ प्रभावाने कायमस्वरूपी निष्कासित करण्यात आले आहे. या चौघांवर पक्षशिस्त मोडल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या चौघांनी उघडपणे कुणाल राऊत यांच्या कार्यपद्धतीवर टीका केली होती. तसेच राऊत यांची संघटनेतील वरिष्ठ नेत्यांकडे तक्रार केली होती.

सरसंघाचलक मोहन भागवत यांच्या वक्तव्याच्या विरोधातील आंदोलनात सहभागी न झाल्याने प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल राऊत यांनी तडकाफडकी ६० पदाधिकाऱ्यांना कार्यमुक्त केले होते. त्यापैकी आता चार जणांविरुद्ध निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

## सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सुधारणा संदर्भात बैठक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सहकारी संस्थांच्या निवडणूका मोकळ्या व भयमुक्त वातावरणात आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण आहे. या प्राधिकरणाच्या नावात बदल करून राज्य सहकारी निवडणूक आयोग करण्यासंदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सुधारणा करण्यासंदर्भात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

साखर भवन, नरिमन पॉईंट येथे सहकार मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोईर, सहकार आयुक्त दीपक तावरे, संबंधित अधिकारी उपस्थित होते.



सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी तमिळनाडू, ओडिसा, कर्नाटक, उत्तर प्रदेश या राज्यांनी आयोगाची स्थापना केलेली आहे.त्याच धर्तीवर प्राधिकरण ऐवजी आयोग असा नावात बदल करण्यासंदर्भात सकारात्मक चर्चा झाली.

तीन राखीव जागांपैकी कोणत्याही जागेवर व्यक्तीच्या निवड न झाल्यास अशा राखीव जागा पोट-कलम अनव्ये निवडणूक लढविण्याचा हक्क असलेल्या व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे समितीच्या सभेमध्ये राज्य सहकारी निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या प्राधिकृत अधिकारी यांचेमार्फत भरण्यात येतील. तसेच महिला राखीव प्रवर्गातील पदे निवडणुकीदरम्यान रिक्त राहिल्यास पदे नामनिर्देशनाद्वारे भरण्याकरिता विहित कार्यपद्धती नमूद नसल्यामुळे व पदे भरण्याचे अधिकार आयोगाचे अशी तरतूद करणे आवश्यक असल्याबाबतही सविस्तर चर्चा यावेळी झाली.

# राज्यातील सर्व शासकीय इमारतींचे विहित मुदतीत सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करावे - उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार व केंद्र शासनाच्या 'पीएम सूर्यघर मुफ्त बिजली योजने'अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यांमधील सर्व शासकीय इमारतींचे १५ डिसेंबर २०२५ पूर्वी सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्या अनुषंगाने राज्यातील सर्व शासकीय इमारतींचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करणे आवश्यक असून शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. त्याप्रमाणे सर्व शासकीय इमारतींचे विहित मुदतीत सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करावे असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री



अजित पवार यांनी दिले. राज्यातील शासकीय इमारतींचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयातील समिती कक्षात बैठक झाली.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, आतापर्यंत राज्यातील ११५७ शासकीय इमारतींवर सौर रूफटॉप प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. तथापि उर्वरित ३३२ शासकीय इमारतींवर हे प्रकल्प तातडीने कार्यान्वित करावे. याबाबत दर तीन महिन्यांनी बैठक घेऊन आढावा घेण्यात येईल. महाऊर्जा विभागाने इमारतीवर ज्या दिवशी पॅनल बसवले त्याच दिवशी विद्युत मीटर सुरू करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.या योजनेअंतर्गत होत असलेली कामे अधिक गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार झाली पाहिजेत असे निर्देशही त्यांनी दिले.

यावेळी जिल्हा नियोजन विभागामार्फत पुणे जिल्ह्यातील शासकीय इमारतींवर कार्यान्वित होत असलेल्या सौर प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. प्रलंबित प्रकल्पांसाठी जिल्हा नियोजन समिती मधून यासाठी तातडीने निधी देण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. पवार यांनी यावेळी दिले.

या बैठकीस नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव व विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा,वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव तथा महाऊर्जाच्या महासंचालक श्रीमती आभा शुक्ला, महाऊर्जाचे अतिरिक्त महासंचालक डॉ. त्रिगुण कुलकर्णी, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी (दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे) व ऊर्जा, वित्त विभागाचे सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

CMYK

## उत्तराखंडचे स्वागतार्ह पाऊल...

उत्तराखंडमध्ये 'समान नागरी कायदा' लागू होताच, मुल्ला-मौलवी आणि त्यांच्या संघटनांनी अपेक्षेप्रमाणे असंतोषाची बांग ठोकली. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने देशात 'समान नागरी कायदा' लागू करण्याची आवश्यकता यापूर्वी वारंवार विशद केली आहेच. तेव्हा राज्यघटनेला जी समानता अपेक्षित आहे, ती 'समान नागरी कायद्या'च्या माध्यमातूनच साध्य होईल, ही काळ्या दगडावरची रेघ! उत्तराखंडमध्ये सोमवारपासून 'समान नागरी कायदा' लागू झाल्यानंतर 'जमियत उलेमा-ए-हिंद'ने या कायद्याला विरोध करणारे निवेदनच जारी केले.'समान नागरी कायदा' हा कोणत्याही परिस्थितीत मुस्लिमांना अमान्य असल्याचे निवेदनात म्हटले आहे. 'जमियत उलेमा-ए-हिंद'चे अध्यक्ष मौलाना महमूद असद मदनी यांनी उत्तराखंडमध्ये लागू करण्यात आलेल्या या कायद्याला धार्मिक स्वातंत्र्याच्या घटनात्मक अधिकाराचे उल्लंघन असल्याचे संबोधले असून, त्यांनी त्याची तुलना थेट लोकशाहीवरील हल्ल्याशी केली. इस्लामी शरियाचे समर्थन करताना, त्यांनी मुस्लीम शरियत कायद्याचे पालन करण्यावर ठाम असून, त्याला आव्हान देणार्या कोणत्याही कायद्यापासून विचलित होणार नाहीत, असा पुनरुच्चार केला. धर्मांध म्हणा नेहमीच शरियाचा आधार घेतात. तथापि, त्यांना शरिया हवा, मात्र केवळ त्यांच्या फायद्यासाठी, लाभासाठी. उत्तराखंडमधील सर्व धर्मीयांना आता विवाह, घटस्फोट, पोटगी आणि वारसा हक्क यासाठी 'समान नागरी कायद्या'चे पालन करावेच लागेल. त्यामुळे आपसुकच तिहेरी तलाक, हलाला आणि इद्दत यांसारख्या महिलांच्या मानवी हक्कांना पायदळी तुडवणार्या मध्ययुगीन प्रथांना आता अजिबात थारा नसेल. पती-पत्नी दोघेही जिवंत असताना दुसरे लग्न करण्यास देखील पूर्णपणे मनाई असेल. त्यामुळे एकूणच मुस्लीम समाजातील महिलांना या कायद्यामुळे सर्वार्थाने न्यायच मिळणार आहे. अशा या कायद्यातील न्याय्य तरतुदींमुळे 'जमियत'सारख्या धर्मांध संघटनांची पायाखालची वाळू सरकली असून, त्यांनी याविरोधात विरोधाचे सूर आळवले आहेत. खरं तर घटनेतील समानता अधोरेखित करत, देशाच्या सर्वांगीण विकासासाठी 'समान नागरी कायदा' ही काळाची गरज. 'समान नागरी कायदा' हा भारतातील सर्व नागरिकांना, मग त्यांचा धर्म कोणताही असो, नियंत्रित करणार्या कायद्यांचा एकच भाग असेल. याचाच अर्थ सर्व भारतीयांना कायद्यानुसार समान वागणूक दिली जाईल. संविधानाला अपेक्षित असलेल्या धर्मनिरपेक्षता आणि समानतेच्या तत्त्वांनुसारच हा कायदा असेल. देशातील सर्वोच्च न्यायालयाने देखील वेळोवेळी 'समान नागरी कायद्या'चे समर्थनच केले आहे. तसेच संविधानाने दिलेला तो मूलभूत अधिकार असल्याचे सांगितले आहे. पण, याच संविधानाचा आजवर चुकीच्या पद्धतीने वापर धर्मांधांकडून केला गेला, नव्हे त्यांना तो तसा काँग्रेसी राजवटीत करू दिला गेला. कायदे पाळताना संविधान नको, शरिया हवा ही धर्मांधांची मागणी अव्यवहार्य आणि अतार्किकच! आताच नव्हे तर पूर्वीपासूनच धर्मांधांनी 'समान नागरी कायद्या'ला विरोधच केला आहे. 'समान नागरी कायदा' हा राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा त्यांचा आरोप. त्यांच्या मते, भारतात या कायद्याची काहीही गरज नाही, तसेच त्याचा कोणताही फायदा होणार नाही. भारतात वेगवेगळे धर्म, संस्कृती आहेत. या विविधतेचा आपण आदर केला पाहिजे. धार्मिक स्वातंत्र्य हा मूलभूत हक्क असून, तो धार्मिक स्वातंत्र्याचाच एक भाग आहे. 'समान नागरी कायद्या'मुळे धार्मिक स्वातंत्र्यावर हल्ला केल्यासारखे होईल, अशा शब्दांत धर्मांधांनी 'समान नागरी कायद्या'च्या नावाने कायमच बोटे मोडण्याचे आणि अल्पसंख्याक समाजाची माथी भडकाविण्याचे काम केले. मुस्लीम समाजाचे कायदे हे कुराण आणि हदीसमधून घेण्यात आले आहेत. सरकार त्यांच्या धार्मिक बाबींमध्ये हस्तक्षेप करू शकत नाही, असाही या मुस्लीम संघटनांचा तोरा. पण, एकूणच काय तर स्वधर्माचे फायदेही लाटायचे आणि कायदे मात्र भारतीय दंडसंहितेचे पाळायचे, अशी ही त्यांची दुटप्पी भूमिका! शाहबानो प्रकरणात १९८५च्या निकालात निवाडा देताना सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले होते की, 'एक समान नागरी संहिता राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडतेची भावना प्राप्त करण्यास मदत करेल. तो लागू करणे हे कर्तव्य आहे.' गेल्या काही वर्षांत सर्वोच्च न्यायालयाने या कायद्याला पाठिंबा देण्याचा पुनरुच्चारदेखील केला. एका निकालात सर्वोच्च न्यायालयाने, असे म्हटले आहे की, 'समान नागरी कायदा' लागू करण्यासाठी पावले उचलण्याची वेळ आली आहे. २०२१च्या निकालात 'समान नागरी कायदा' हा संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार असल्याचेही न्यायालयाने नमूद केले होते. पण, आज 'संविधान बचाव'च्या नावाने कंठशोष करणारे काँग्रेससारखे पक्ष मात्र सोयीस्कररित्या या धर्मांधांच्या सुरात सूर मिसळताना दिसतात, जे संविधानविरोधी कृत्य म्हणता येईल. काँग्रेसने आजवर अल्पसंख्याकांच्या लांगूलचालनाचे जे चुकीचे धोरण अवलंबले, त्याचाच परिपाक म्हणून धर्मांधांना वारेमाप सवलती पदरात पाडता आल्या. इतकेच काय शाहबानो प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने विरोधात निकाल दिल्यानंतरही, मुस्लिमांची एकगठ्ठा मते हातातून निसटायला नकोत, यासाठी तो निर्णयच रद्दबादल केला गेला. भाजपने म्हणूनच जेव्हा 'समान नागरी कायदा' आणण्याचे जाहीरनाम्यात आश्र्वासन दिले, तेव्हा भाजप धर्माच्या आधारावर देशाचे तुकडे करणार, असा अपप्रचारही काँग्रेसने केला. प्रत्यक्षात हा कायदा भारतीयांच्या हितासाठी आवश्यक असाच आहे, याकडे अगदी सोयीस्करपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. भारतात राहायचे असेल, तर भारताचा कायदा पाळावा लागेल, असा स्पष्ट संदेश उत्तराखंडच्या 'समान नागरी कायद्या'ने दिला आहे. 'समान नागरी कायद्या'चा उद्देश कोणत्याही धर्माला नख लावण्याचा नसून, सर्वांना देशाचे नागरिक या एकाच दृष्टिकोनातून समान न्याय देणे, हाच आहे. किंबहुना, संविधानालाही तेच अपेक्षित आहे. भाजप संविधानाला अपेक्षित असलेली समताच यातून साधत आहे. उत्तराखंड सरकारने 'समान नागरी कायदा' लागू करत, न्यायालयाचा आदरच केला आहे. त्यामुळेच 'समान नागरी कायद्या'ला पर्याय नाही, हे देशातील सर्वांनीच समजून घ्यावे, तेच अपेक्षित आहे.

# १८ जिल्ह्यांसह राज्यभर अहिल्या भवन उभारण्याच्या कार्यवाहीस गती द्यावी - महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे

### महिलांना रोजगार देण्यासाठी पिंक रिक्षा योजनेअंतर्गत ५ हजार महिलांना लवकरच रिक्षा वाटप करणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महिला आणि बालकांच्या सुरक्षेसाठी, त्यांच्या सबलीकरणासाठी अहिल्या भवनाच्या माध्यमातून अतिशय महत्वाचे काम सुरू होणार आहे. १८ जिल्ह्यात अहिल्या भवनचे कार्य सुरू असून, राज्यातील उर्वरित जिल्ह्यासाठी मध्यवर्ती ठिकाणी अहिल्या भवन उभारण्यासाठीच्या प्रक्रियेस गती देण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

मंत्रालय येथील दालनात महिला व बालकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी विभागामार्फत सुरू असलेल्या योजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी विभागाचे सचिव अनुपकुमार यादव, आयुक्त कैलास पगारे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. लवकरच ४ जिल्ह्यातील अहिल्या भवनचे लोकार्पण करण्यासंदर्भातील कार्यवाही करण्याच्या सूचनाही महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी यावेळी दिल्या.

महिला व बालविकास मंत्री तटकरे म्हणाल्या की, प्रत्येक जिल्ह्यात उभारण्यात येणारे हे अहिल्या भवन महिला, बालक व दिव्यांगांना सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी सज्ज असणार आहे. तसेच अहिल्या भवन उभारण्यासंदर्भातील पायाभूत सुविधा उभारण्याचे निर्देशही तटकरे यांनी यावेळी दिले.

महिला व मुलींना रोजगार मिळावा, त्यांचे आर्थिक, सामाजिक सक्षमीकरण व्हावे, आणि महिला वर्गाचा प्रवास सुरक्षित व्हावा, यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'पिंक ई-रिक्षा' च्या योजनेसंदर्भात संबंधितांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. प्राप्त अर्जापैकी पाच हजार पात्र महिलांना लवकरच या योजनेअंतर्गत रिक्षाचे वितरण करण्यात येणार आहे.

याचबरोबर रस्त्यावर राहणाऱ्या मुलांना शिक्षणाच्या व समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी फिरते पथक कार्यरत असून, आजतागायत तीन हजारपेक्षा जास्त मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम विभागाने या पथकाच्या माध्यमातून केले आहे. प्रायोगिक तत्वावर सुरू असलेल्या हा उपक्रम व्यापक स्वरूपात सुरू करण्यासाठीची कार्यवाही करण्यासंदर्भातही महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी सूचना दिल्या.

नोकरी करणाऱ्या महिलांच्या मुलांसाठी पाळणाघर आवश्यक असल्याने गरजु महिलांच्या मुलांसाठी अंगणवाडी केंद्रासोबत पाळणाघर सुरू करण्यात येणार आहे. पाळणाघर सेविका व मदतनिस यांचे मानधन तसेच निर्भया समुपदेशन केंद्रावरील समन्वयकाचे मानधन वाढविण्यासंदर्भातही सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याचेही तटकरे यांनी यावेळी



उपस्थित समन्वयक महिलांना सांगितले. तसेच, माध्यमिक शिक्षणाकडे वळणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढविण्यासाठी शिक्षण विभागाशी समन्वय साधुन उपाययोजना आखण्यासंदर्भातही निर्देश तटकरे यांनी यावेळी दिले.

लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांकडून रक्कम परत जमा करण्याबाबत शासनाकडून सक्ती नाही

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमधील लाभार्थी महिलांकडून त्यांना दिलेला लाभ शासनाकडून सक्तीने परत घेण्यात येत नाही. असे स्पष्टीकरण महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव यांनी केले आहे.

काही लाभार्थी महिला योजनेच्या अटी शर्तीनुसार अपात्र ठरत असल्याने स्वेच्छेने लाभाची रक्कम परत करत आहेत. तसेच ज्या महिलांकडून पुढील कालावधीतील लाभ नको असल्याबाबत स्वेच्छेने कळविण्यात येत आहे अशा महिलांची विनंती विचारात घेवून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

## नांदेडमध्ये तृतीयपंथी समुदायासाठी दोन दिवसीय व्यवसाय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** उधऊ-संस्था आणि सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने तृतीयपंथी बांधव आणि भगिनींसाठी दोन दिवसीय व्यवसाय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचा उद्देश तृतीयपंथी समुदायाला स्वावलंबी बनवणे, उद्योजकतेसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे आणि आर्थिक साक्षरता प्रदान करणे हा होता.

या प्रशिक्षणात सुमारे ३७ तृतीयपंथी बांधव आणि भगिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि विविध व्यवसाय कौशल्ये आत्मसात केली. कार्यशाळेत व्यवसायाची योग्य कल्पना कशी निवडावी, व्यवसायाची वाढ कशी साधावी, बचतीचे महत्त्व, वित्तीय साक्षरता, डिजिटल साक्षरता तसेच व्यवसायासाठी शासकीय योजनांचा कसा लाभ घ्यावा याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

सहभागी तृतीयपंथीयांनी या प्रशिक्षणाचा उत्कृष्ट प्रतिसाद दिला. त्यांनी व्यवसाय प्रशिक्षणाचे फॉर्म भरून आपल्या व्यवसायाचे नियोजन केले आणि भविष्यात स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमामुळे तृतीयपंथी समुदायातील अनेक जणांना आर्थिक स्थैर्य आणि स्वावलंबनाच्या दिशेने प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमाच्या शेवटी सामाजिक कल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांच्या हस्ते सहभागींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे तृतीयपंथी समुदायाला नवी संधी आणि आर्थिक स्वातंत्र्याच्या दिशेने मजबूत पाऊल उचलण्याची संधी प्राप्त झाली.

सामाजिक समावेश आणि आर्थिक स्वावलंबनाच्या दृष्टीने अशा उपक्रमांचे मोठे महत्त्व असून, भविष्यातही तृतीयपंथी समुदायाच्या सशक्तीकरणासाठी असे उपक्रम राबवले जावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## एका किसींग सीनसाठी ३७ रिटेक, Kiss करून करून थकला अभिनेता

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडमध्ये रोमँटिक आणि चार्मिंग हिरो आहेत. अनेक तरूणी त्यांच्यावर फिदा आहेत. सिनेमातील त्यांचे रोमँटिक सीन्स पाहून अनेक जणी घायाळ होतात. पण ते रोमँटिक सीन देताना त्या चार्मिंग अभिनेत्याच्या तोंडचं पाणी पळत. बॉलिवूडच्या अशाच एका चार्मिंग अभिनेत्याने किसिंग सीनसाठी ५-१० नाही तर तब्बल ३७ वेळा रिटेक दिले. तरीही त्यातील एकही शॉट फायनल करण्यात आला नाही.

बॉलीवूड त्याच्या रोमँटिक चित्रपटांसाठी ओळखले जाते आणि आज आपण एका लोकप्रिय अभिनेत्याबद्दल बोलणार आहोत त्याने आतापर्यंत १८ सिनेमे केले आहेत, ज्यात ८ हिट आलेत. त्यापैकी ३ रेकॉर्डब्रेक होते. बॉलीवूडचा चॉकलेट बॉय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या अभिनेत्याला एकदा शूटिंगदरम्यान ३७ वेळा किसिंग सीन पुन्हा करावा लागला आणि नंतर त्याने रीटेकसाठी अभिनेत्रीला दोष दिला.

२०१४ च्या कांची: द अनब्रेकेबल चित्रपटादरम्यान ही घटना घडली होती, ज्यामध्ये कार्तिक आर्यनने मिष्टी चक्रवर्तीसोबत काम केले होते. सुभाष घई दिग्दर्शित या चित्रपटात कार्तिक रोमँटिक हिरोच्या भूमिकेत दिसला. एक विशिष्ट चुंबन दृश्य आव्हानात्मक ठरले.

किसिंग सीन ठरला डोकेदुखी

एका मुलाखतीत कार्तिकने शेअर केले की, किसिंग सीन इतका डोकेदुखी होऊ शकतो याची मी कल्पनाही केली नव्हती. त्यादिवशी, आम्ही प्रेमीयुगुलांप्रमाणे वागलो, पण ते योग्य होण्यासाठी ३७ रिटेक घेतले. जेव्हा सुभाषजी शेवटी म्हणाले, 'ठीक आहे, तेव्हा आम्हाला खूप दिलासा मिळाला.

कार्तिकनेही या अनुभवाची खिल्ली उडवत म्हटले, मला वाटले की मिष्टीने मुद्दाम गोंधळ घातला असावा. सुभाष घई यांना अतिशय पॅशिनेटिंक किस सीन हवा होता आणि खरं सांगायचं तर तो कसा करायचा ते मला माहीत नव्हते! मी त्याला विचारण्याचा विचारही केला, 'सर, तुम्ही मला किस कसे करायचे ते का दाखवत नाही?'

## महाराष्ट्रात राजकीय वादळ, दिल्लीत खळबळ! बीड प्रकरणी धनंजय मुंडे राजीनामा देणार?

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात राजकीय वादळ निर्माण झाले आहे. बीड प्रकरणी धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा अशी जोरदार मागणी होतेय. या पार्श्वभूमिवर धनंजय मुंडे यांच्या उपमुख्यमंत्री अजित पवार , मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीगाठीही झाल्यात.तसंच आज धनंजय मुंडे दिल्लीतही भेटीगाठी घेतायत अशी सूत्रांकडून माहिती मिळत आहे.

धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यासाठी दबाव वाढत आहे. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांसह भाजप आमदार सुरेश धस यांनी लावून धरली आहे. त्यामुळे धनंजय मुंडे तातडीनं दिल्लीला गेले आहेत. देवेंद्र फडणवीसही तीन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. त्यामुळे धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचा निर्णय दिल्लीत होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झालीय.. तर म ुंडेंच्या दिल्ली दौऱ्यावरुन खासदार संजय राऊतांनीही टोला लगावला आहे.

दिल्ली दौऱ्यादरम्यान पत्रकारांनी धनंजय मुंडेंना गाठून राजीनाम्याबाबत विचारणा केली असता मला टार्गेट केलं जातंय. जर मी दोषी असेन तर मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री सांगतील आणि मी राजीनामा देईन असं वक्तव्य मुंडेंनी केले आहे. २१व्या शतकात काही लपून राहात नाही. माझ्या आधी माझे विचार तुम्हाला कळतात असा टोलाही त्यांनी लगावला.

अजित पवार ठरवतील माझ्या विषयी काय करायचे. पक्ष आणि अजितदादा यांनी आदेश दिला तर लगेच राजीनामा देईल अशी भूमिका धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादीच्या बैठकीत मांडली. वैयक्तिक काहीजण राग ठेवत आरोप करत असल्याचा खुलासा धनंजय मुंडे यांनी बैठकीत केला, उपमुख्यमंत्री अजित पवार धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत काय निर्णय घेणार याकडे आता लक्ष लागले आहे.

दरम्यान, वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडेंविषयी विचारलेल्या प्रश्नावर पंकजा मुंडेंचा उत्तर देणे टाळले. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर काहीही म्हणण नाही. मी फक्त ऐकुन घेते असे पंकजा मुंडे म्हणाल्या. पंकजा मुंडेंनी मंत्रालयात जाऊन अजित पवारांची भेट घेतली.

### सिद्धिविनायक मंदिरात शॉर्ट, स्कर्टला विरोध म्हणजे महिलांवर अन्याय, सदावर्तेंच्या मुलीची राष्ट्रीय महिला आयोगात तक्रार

**मुंबई/प्रतिनिधी :** वकील गुणरत्न सदावर्ते यांची कन्या झेन सदावर्ते हिने मुंबईतील सिद्धिविनायक मंदिर प्रशासनाची राष्ट्रीय महिला आयोगात तक्रार केली आहे. ''महिलांनी स्कर्ट, शॉर्ट घालून सिद्धिविनायक मंदिरात येऊ नये, असे म्हणणे महिलांसोबत अन्याय आहे. संविधानाच्या तरतुदींची पायमल्ली आहे'', असे झेन सदावर्ते हिने तक्रारीत नमूद केलं आहे.

मी झेन सदावर्ते १२ वीत शिकत असून नॅशनल ब्रेवरी अवार्डची विजेती आहे. सिद्धिविनायक मंदिरात महिलांसाठी ड्रेस कोड लागू करण्यात आलाय. भक्तांवर लादण्यात आलेला हा ड्रेस कोड सामाजिकदृष्ट्या चुकीचा आणि भेदभाव करणारा आहे, असं माझं मत आहे.

# सैफच्या आरोपीला कोर्टात नेताना गाडी बंद पडली, पोलिसांनी धक्का मारला, तरीही गाडी स्टार्ट झालीच नाही!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता सैफ अली खान प्रकरणातील आरोपी मोहम्मद शहजादला आज कोर्टात हजर करण्यात आलं पण, त्याआधी पोलिसांची गाडी बंद पडली. त्यावेळी पोलिसांनी गाडी धक्का मारला पण, गाडी सुरु झाली नाही. दरम्यान, तरीही गाडी सुरु झाली नाही. आरोपीची पोलिस कोठडी संपल्याने त्याला पुढील सुनावणीसाठी न्यायालयात हजर करण्यात आलं. सैफ अली खान हल्ला प्रकरणातील आरोपी १९ जानेवारीपासू पोलिस कोठडीमध्ये आहे. सैफ अली खान हल्ला प्रकरणाचा पोलिस तपास करत असून आरोपी विरोधात भक्कम पुरावे असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे. आता आरोपीच्या पोलिस कोठडीत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सैफ अली खान प्रकरणातील आरोपी मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजादला आज न्यायालयात घेऊन जाण्यासाठी पोलिस बाहेर पडले. आरोपीला पोलिसांच्या व्हॅनमध्ये टाकून पोलिस निघाले. पण, अचानक गाडी बंद पडली. यानंतर पोलिसांना उतरुन गाडीला धक्का मारावा लागला. पोलिसांनी धक्का मारुनही गाडी स्टार्ट झाली नाही, त्यानंतर पोलिसांना दुसऱ्या गाडीतून जावं लागलं.

पोलिसांनी धक्का मारला, पण गाडी स्टार्ट होईना

पोलिस आरोपीला एका मोठ्या गाडीतून घेऊन जात होते, पण गाडी पोलिस स्टेशनपासून सुमारे १०० मीटर अंतरावर पोहोचताच थांबली. त्यानंतर पोलिसांनी ताबडतोब गाडीतून खाली उतरून गाडी ढकलण्यास सुरुवात केली, पण गाडी सुरू न झाल्याने आरोपीला ताबडतोब एका लहान गाडीत हलवण्यात आले आणि पोलिसांनी आरोपीला न्यायालयात नेलं.

नेमकं काय घडलं?

अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणारा आरोपी शरीफुल इस्लाम शहजाद याची पोलिस कोठडी बुधवारी संपल्यानंतर, मुंबईतील त्याला वांद्रे पोलिसांनी वांद्रे न्यायालयात हजर करण्यासाठी नेत असताना ही घटना घडली. सैफ अली खान प्रकरणातील आरोपी मोहम्मद शहजाद याची पोलिस कस्टडी आज संपली.

त्यानंतर त्याला २९ जानेवारी वांद्रे कोर्टात हजर करण्यात आलं. पोलिसांकडून त्याच्या अधिक चौकशीसाठी पुन्हा पोलिस कोठडीची मागणी करण्यात आली. आरोपीविरोधात भक्कम पुरावे असल्याचा दावा मुंबई पोलिसांनी यावेळी न्यायालयात केला. न्यायालयाने आरोपी आणि पोलिसांची बाजू ऐकून घेतल्यावर आरोपीला न्यायालयीन कोठडी दिली.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# 'म्हाडा'च्या माध्यमातून दोन वर्षात एक लाख घरे उभारणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी राज्य शासन कटीबद्ध असून येत्या दोन वर्षात म्हाडाच्या माध्यमातून सुमारे एक लाख घरांच्या उभारणीचे सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी राज्याचे गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीएसह सोलापूर जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील ३,६६२ सदनिकांच्या विक्रीकरिता संगणकीय सोडत उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री तथा पुणे पालकमंत्री अजित पवार, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, म्हाडा पुणे मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत दूरदृश्य प्रणालीद्वारे काढण्यात आली. यावेळी श्री. शिंदे बोलत होते.

विविध योजनांच्या माध्यमातून परवडणाऱ्या घरांची निर्मिती

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, या गृहनिर्माण धोरणानुसार सर्वसामान्य नागरिक, काम करणाऱ्या महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ठिकठिकाणी वसतिगृह उभारले जाणार आहेत. म्हाडा पुणे मंडळाच्या ३६६२ सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित सोडतीसाठी अनामत रकमेसह ७१,६४२ अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्जदारांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणावर (म्हाडा) दाखवलेला हा विश्वास आहे. अर्जदारांचा हाच विश्वास सार्थ ठरवण्यासाठी घरांच्या गुणवत्ता व सोडतीच्या पारदर्शकतेमध्ये कुठेही तडजोड न करता सोडतीतील विजेत्या अर्जदारांना तात्काळ सदनिकांचा ताबा देण्यात यावा. महाराष्ट्र शासन विविध योजनांच्या माध्यमातून परवडणाऱ्या घरांची निर्मिती करीत आहे.

मुंबई पुणे, ठाणे या शहरांमध्ये समूह पुनर्विकास योजनेद्वारे योजनाबद्ध गृहनिर्मिती

'म्हाडा'ने गेल्या दीड वर्षात १३ सोडतींच्या माध्यमातून सुमारे ३० हजार घरे उपलब्ध करून दिली आहेत, ही कौतुकास्पद बाब असल्याचे ते म्हणाले. रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प मार्गी लागावेत व झोपडपट्टी पुनर्विकास व्हावा यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात गृहसाठा उपलब्ध होणार आहे. मुंबई पुणे, ठाणे या शहरांमध्ये समूह पुनर्विकास योजनेद्वारे योजनाबद्ध गृहनिर्मिती करण्यासाठी शासनातर्फे प्रयत्न केले जात असल्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले. पुणे येथे देखील समूह पुनर्विकास योजना राबवण्याचे सूतोवाच श्री. शिंदे यांनी केले.

सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी कटीबद्ध

उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार म्हणाले की, मानवी हस्तक्षेपविरहित संपूर्णतः ऑनलाइन अशा या संगणकीय प्रणालीद्वारे ही सोडत प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या नूतन प्रणालीनुसार अर्ज नोंदणीकरण व पात्रता निश्चिती झाल्यानंतरच अर्जदार सोडत प्रक्रियेत सहभागी होतो. सोडतीत विजेता ठरल्यानंतर, अर्जदारास सूचना पत्र पाठविले जाते व त्यातील तरतुदींची पूर्तता केल्यानंतर विजेत्या अर्जदारांना तात्पुरते देकार पत्र पाठविले जाते. ही सर्व प्रक्रिया अत्यंत सोपी, सुलभ व पारदर्शक असून त्यासाठी कुठलाही मध्यस्थ/दलाल म्हाडाने नेमलेला नाही. म्हाडाचा लाभार्थी ही म्हाडासाठी मोठी गुंतवणूक असून लाभार्थी हेच म्हाडाचे ब्रँड अँबेसिडर आहेत. सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र शासन कटीबद्ध असल्याचे श्री. पवार यांनी सांगितले.


श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी पुणे मंडळाने मोठ्या प्रमाणात परवडणारी घरे उपलब्ध करून दिल्याचे सांगितले.

म्हाडाच्या ्हरवरेषष्ठलळरश्र या अधिकृत यूट्यूब व फेसबूक समाजमाध्यम व्यासपीठांवरुन सोडतीचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. थेट प्रक्षेपण ४८,००० जणांनी बघितले.

सोडतीमधील विजेत्या अर्जदारांची यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या वेबसाईटवर सायंकाळी ६.०० वाजता प्रसिद्ध केली जाणार असून विजेत्या अर्जदारांना एसएमएसद्वारेही विजेता ठरल्याबाबतची माहिती तात्काळ कळविली जाणार आहे.

यावेळी ठाणे जिल्हाधिकारी श्री. अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखडे, म्हाडा पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे, उपमुख्य अभियंता सुनील ननावरे, अनिल अंकलगी, मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी सविता बोडके, उपमुख्य अधिकारी अतुल खोडे, उपअभियंता मनीषा मोरे आदी उपस्थित होते.

## म्हाडा पुणे मंडळातर्फे ३६६२ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत उत्साहात




## संक्षिप्त...

### जालन्याच्या अंतरवाली सराटी येथे उपोषणकर्त्या महिलेला आली चक्कर



दैनिक आपला विदर्भ


**जालना/प्रतिनिधी :** जालन्याच्या अंतरवाली सराटी येथे एका उपोषणकर्त्या महिलेला चक्कर आलीय. ४ दिवसांपासून जेवण न केल्याने उपोषणकर्त्या महिलेला चक्कर आलीय. या महिलेवर तातडीने उपचार सुरू करण्यात आलेत. उपस्थित डॉक्टरांनी उपोषणकर्त्या महिलेची तातडीने तपासणी करून त्यांच्यावर उपचार सुरू केलेत.

### कुख्यात बिल्डर सलमान डोलारे याचा आणखीन एक कारनामा समोर





दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याणमधील कुख्यात बिल्डर सलमान डोलारे यांचा अजून एक कारनामा समोर आला आहे.



९ मजली इमारत आणि एक भला मोठा बंगल्याचे अनधिकृत बांधकाम केले आहे. इमारतीमधील सर्व सदनिका आणि वाणिज्य गाळे विकून टाकल्या आहेत. यूसूफ हाईटसनंतर कल्याणमधील जे.एम. टॉवर आणि जमजम व्हीला बंगला अनधिकृत घोषित झाल्याने रहिवासी हवालदील झाले आहे. आत्ता या इमारतीवर लवकर कारवाईचा हातोडा चालविणार जाणार असल्याची माहिती केडीएमसीचे उपायुक्त अवधूत तावडे यानी दिली आहे. धक्कादायक म्हणजे केडीएमसी आणि शेकडो नागरिकांची फसवणूक करणाऱ्या बिल्डर सलमान डोलारे याच्या विरोधात अनेक गुन्हे दाखल होऊनही त्याला पोलिस शोधू शकलेले नाहीत.

### हनी ट्रॅपमध्ये व्यापाऱ्याकडून १५ लाख उकळले; महिलेसह ४ आरोपी अटकेत





दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर शहरातील एका नामांकीत सराफा व्यापाऱ्याला व्हाट्सअॅपवर अश्र्लील संवादाच्या आधारे हनी ट्रॅपमध्ये अडकवत लाखो रुपयेही उकळल्याची घटना उघडकीस आली आहे. व्यापाऱ्याकडून लाखो रुपये उकळणाऱ्या टोळीला पोलिसांनी सिटी चौक पोलीस ठाणे हद्दीत सापळा लावत एका महिलेला आणि चार आरोपींना २० हजार रुपये रोख घेताना ताब्यात घेतले. पुष्पा साळवे या २४ वर्षीय महिलेसह मानसी मनोहर जाधव (शिर्के), अर्जुन लोखंडे, आणि आदित्य शेरे अशी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत. त्या आरोपींकडे एक बंदूक देखील होती. महिलेने प्रथम व्यापाऱ्याशी मैत्री वाढवली त्यानंतर या दोघांमध्ये व्हॉटपवर बोलणे सुरू झाले. काही व्हिडिओची देखील देवाण-घेवाण झाली. यातून झालेल्या अश्र्लील संवादातून मागील आठ महिन्यांपासून ही टोळी या व्यापाऱ्याला ब्लॅकमेल करीत होती. आतापर्यंत या टोळीने व्यापाऱ्याकडून सुमारे १५ लाख रुपये उकळल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत अधिक माहिती पोलीस उपायुक्त नितीन बागडे यांनी दिली आहे.

# 'सेन्सेक्स'मध्ये सलग दुसऱ्या सत्रात मजबूत ६३१ अंशांची भर; दलाल स्ट्रीटवरील आजच्या तेजीमागील दडलंय काय?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक तंत्रज्ञान शेअर्सना तीव्र घसरणीचा फटका बसत असताना, भारताच्या शेअर बाजारात मात्र आयटी निर्देशांक बुधवारी (२९ जानेवारी) १.५ टक्क्यांनी वधारला. सलग दुसऱ्या सत्रात सहा शतकी भर घालून ७६,५००पलीकडे उसळलेल्या 'सेन्सेक्स'च्या तेजीत या आयटी शेअर्सच्या मजबूत कामगिरीसह, बँकिंग आणि वित्त समभागांमधील दमदार खरेदी कारणीभूत ठरली.

बुधवारच्या सत्रात सेन्सेक्स आणि निफ्टीने सलगपणे आगेकूच कायम राखत, कमाईचे प्रमाण वाढविले. बँकिंग आणि आयटी शेअर्समधील जोरदार तेजीमुळे, दिवसअखेर बीएसई सेन्सेक्स ६३१.५५ अंशांच्या वाढीसह ७६,५३२.९६ या पातळीवर स्थिरावला. तर एनएसई निफ्टी निर्देशांक २०५.८५ अंशांची भर घालून दिवसअखेर २३,१६३.१० वर बंद झाला. दोन्ही निर्देशांकांनी अनुक्रमे ०.८३म आणि ०.९०म अशी वाढ साधली. मंगळवारच्या सत्रातही दोन्ही निर्देशांकांनी जवळपास अर्धा टक्क्यांहून अधिक सकारात्मक वाढ साधली होती.

केंद्रीय मंत्रिमंडळाने इथेनॉलच्या खरेदी किमतीत वाढीचा निर्णय घेतल्याने, साखर उत्पादन क्षेत्रातील लाभार्थी कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी उसळी घेतली. बलरामपूर चिनी, रेणुका शुगर्स, धामपूर शुगर मिल्स, बजाज हिंदुस्तान आणि द्वारिकेश शुगर या शेअर्समध्ये ६ ते ९ टक्क्यांपर्यंत वाढ दिसून आली. व्यापक बाजाराचे प्रतिनिधित्व करणारे बीएसई स्मॉलकॅप आणि मिडकॅप निर्देशांक अनुक्रमे ३.२८म आणि २.५४ म असे उसळले. मंगळवारी मुख्य निर्देशांक वाढले असतानाही, हे निर्देशांक अनुक्रमे १.७७म आणि ०.६१म असे गडगडले होते. एकंदरीत बुधवारी बाजारात सर्वव्यापी खरेदीचा जोर होता. परिणामी मुंबई शेअर बाजारात २,१५२ शेअर्स वधारले, तर घसरणाऱ्या शेअर्सची संख्या अवघी ४०६ अशी राहिली

तेजीचे घटक कोणते?

१. भारतीय आयटी कंपन्यांना दिलासा: वर उल्लेखिल्याप्रमाणे, दलाल स्ट्रीटवरील आजच्या तेजीत सर्वात मोठे योगदान हे आयटी शेअर्समधील वाढीचे राहिले. निफ्टी आयटी ऱषूब घऊ निर्देशांकातील सर्व १० शेअर्सनी सकारात्मक क्षेत्रात बंद नोंदविला. हा निर्देशांक तब्बल २.६२म वाढीसह बंद झाला. या तेजीचे नेतृत्व पर्सिस्टंट सिस्टीम्स, एलटीआयएम, एलटीटीएस आणि एम्फॅसिस सारख्या कंपन्यांनी केले. इन्फोसिस, टीसीएस आणि विप्रो सारख्या आघाडीच्या कंपन्यांतही जवळपास २म वाढ झाली. मोतीलाल ओसवाल या दलाली पेढीने, चीनच्या आजएाझ 'डीपसीक्र या अल्पखर्चिक कृत्रिम प्रज्ञा (एआय) मॉडेलमुळे भारतीय आयटी कंपन्यांना धोका सोडाच उलट फायदाच होईल, असे अभ्यास टिपण प्रसिद्ध केल्यानंतर या शेअर्समध्ये तेजी दिसून आली. विषकांचा विश्वास आहे की, आजची आयटी शेअर्सची मजबूत कामगिरी ही जागतिक स्तरावर झालेल्या तीव्र विक्रीच्या पार्श्वभूमीवर विशेषच आश्वासक ठरते.

२. फेडचा व्याजदरासंबंधी निर्णय: बाजारातील व्यवहार आटोपल्यानंतर, भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री उशीरा अमेरिकेची मध्यवर्ती बँक - फेडरल रिझर्व्हचा (फेड) व्याजदरासंबंधी निर्णय येणे अपेक्षित आहे. बदललेल्या परिस्थितीत त्यातून व्याजदर जैसे थे राखण्याचा निर्णय येणे अपेक्षित आहे. तसे जरी झाले तरी ते अपेक्षेप्रमाणेच असल्याने गुरुवारी शेअर बाजारावर त्याचा कोणताही नकारात्मक परिणाम दिसून येण्याची शक्यता नाही.

३. केंद्रीय अर्थसंकल्पाचे वेध: जगाच्या अर्थव्यवस्थेची दोलायमान अवस्था आणि अनिश्चित आव्हाने पाहता, यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पातून मोठ्या प्रमाणात लोकप्रिय घोषणांची शक्यता दिसून येत नाही. अर्थात सरकारच्या कर संकलनातील अपेक्षेप्रमाणे वाढ पाहता, ही सशक्त बनलेल्या महसुली बाजूतून वित्तीय तुटीवर जरी अपेक्षित उद्दिष्टाइतके नियंत्रण मिळविले गेले तरी त्याचे शेअर बाजाराकडून स्वागत होईल. तुटीवर नियंत्रण महागाईवर नियंत्रणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरेल, ज्यायोगे उच्च पातळीवर राहिलेले व्याजाचे दर कमी होण्याचे चक्र सुरू होईल, असा गुंतवणूकदारांचा होरा आहे.

४. रिझर्व्ह बँकेची तरलतापूरक सक्रियता: रिझर्व्ह बँकेने बँकिंग प्रणालीमध्ये तरलता आणण्यासाठी जाहीर केलेल्या उपाययोजनांकडे, पुढील महिन्यात होणाऱ्या व्याजदर कपातीचे संभाव्य पूर्वसंकेत म्हणून विषक आणि गुंतवणूकदार पाहत आहेत. निदान अल्पकालीन कर्जाचे व्याजदर तरी यातून वाढणार नाहीत. म्हणून विशेषत: खासगी बँकांच्या शेअर्समध्ये सलग दुसऱ्या सत्रात उत्साही खरेदी सुरू राहिली. परिणामी निफ्टी बँक छळषीूं इरपज्ञ निर्देशांकाने मंगळवारच्या सत्रातील १.७म वाढीच्या तुलनेत, आज त्यात आणखी ०.६१ टक्क्यांची भर घातली.




सावधगिरी आवश्यक

दमदार उभारीसह शेअर बाजाराने उत्साही फेरवळण घेतले असले तरी, बाजाराकडे पाठ करून परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून (ऋखख) सुरू असलेल्या विक्रीचा हवाला देत आणि फेडरल रिझर्व्हचा निर्णय आणि केंद्रीय अर्थसंकल्प या सारख्या अत्यंत घडामोडी पाहता, अस्थिरतेची छाया कायम असून, गुंतवणूकदारांना सावध राहण्याचा तज्ज्ञांचा सल्ला आहे. अर्थात खरेदी अथवा विक्रीचा निर्णय संयमाने आणि कोणतीही घाई न करता घेतला जावा, असे तज्ज्ञांनी सुचविले आहे.

### येत्या दोन महिन्यात मुंबईत बाईक टॅक्सी सुरु होणार; महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मध्ये पार्टीशन लावणार

**मुंबई/प्रतिनिधी :** परिवहन विभागाने राज्याच वाहतुकीच्या सेवा सुविधा वाढवण्याच्या अनुषंगाने मोठा निर्णय घेतला आहे. येत्या दोन महिन्यांत मुंबईत बाईक टॅक्सी सुरु होणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. बाईक टॅक्सी सुरु करण्याच्याअनुषंगाने परवाने दिले जाणार आहेत.

मुंबईत दिवसेंदिवस प्रवाशांची संख्या वाढत आहेत. यामुळे सध्या उपलब्ध असलेल्या वाहतुकीची साधने अपुरी पडत आहेत. त्यामुळे ठिकाणी वाहतुकीचे पर्याय आणि सोयी कमी आहेत किंवा वाहतूककोंडी होते अशा ठिकाणी बाइक टॅक्सीला परवानगी देण्यात यावी, अशी सूचना झा समितीच्या अहवालात करण्यात आली होती. मात्र राज्य सरकारने ग्रामीण भागासह शहरी भागातही बाइक टॅक्सी चालविण्यास मंजुरी दिली होती. मुंबईत बाईक टॅक्सी सुरु करण्याच्या अनुषंगाने हालचाली सुरु झाल्या आहेत.

पुढच्या दोन महिन्यात रॅपिडो सारख्या बाईक सर्विस मुंबईत सुरु होणार आहेत. बाईक टॅक्सी सुरु करतांना महिला सुरक्षेची विशेष काळजी घेतली जाणार आहे. बाईक चालकाला मागे प्रवासी बसवतांना बाईकच्या मधोमध पार्टीशन लावणे बंधनकारक असेल अशी अट ठेवली जाणार आहे. ओला, उबेर प्रमाणेच मुंबईत बाईक टॅक्सीला परवानगी देण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

# रेडिओ क्लब येथे सुसज्ज आणि दर्जेदार जेट्टी उभारावी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई येथे गेट वे ऑफ इंडिया येथील रेडिओ क्लबजवळ उभारण्यात येणाऱ्या नवीन जेट्टीचे काम दर्जेदार आणि सर्व सोयींनी युक्त करावे अशा सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी दिल्या.

बंदरे विकास मंत्री श्री राणे यांनी रेडिओ क्लब येथे उभारण्यात येणाऱ्या जेटीची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या. यावेळी महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अभियंता पी. प्रदीप, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी प्रदीप बढिये, मुख्य अभियंता राजाराम पुरी गोसावी, मुख्य बंदर अधिकारी कॅप्टन खरा, मुख्य सागरी अभियंता प्रकाश चव्हाण, अधीक्षक अभियंता श्रीकांत बांगर आदींसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी दिल्या सूचना

रेडिओ क्लब येथील जेटी ही प्रवाशांसोबतच पर्यटनासाठी उपयुक्त असणार असल्याचे सांगून श्री. राणे म्हणाले की, या जेटीचे काम लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. आवश्यक असणाऱ्या सर्व विभागांच्या परवानग्या लवकरात लवकर मिळवाव्यात. येथे निर्माण होणाऱ्या सोयी-सुविधा दर्जेदार असाव्यात. या नवीन जेटीमुळे सध्याच्या जेटीवरील ताण कमी होणार आहे. याचा विचार करून याचे काम करावे अशा सूचनाही श्री. राणे यांनी दिल्या.

यावेळी बंदरे विकास मंत्री श्री. राणे यांनी गेट वे ऑफ इंडिया ते रेडिओ क्लब परिसराची पाहणी केली आणि कामाची



सविस्तर माहिती आणि सद्यस्थिती जाणून घेतली.

रेडिओ क्लब येथे प्रवासी आणि पर्यटन यासाठी टर्मिनल इमारतीसह इतर सुविधा उभारण्यात येत आहेत. त्यामध्ये ८० मीटर बाय ८० मीटरचा टर्मिनल प्लॅटफॉर्म, टर्मिनल इमारत, २१४ मीटर लांब आणि १२ मीटर रुंद जेटी, ३५० लोकांची क्षमता असलेले अँफिथियेटर, प्रतीक्षालय, प्रसाधनगृह, पाणपोई, अग्नी सुरक्षा प्रणाली, सीसीटिव्ही यंत्रणा यांचा समावेश आहे.

विविध वृत्त...

## केंद्रीय राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांचा जिल्हा दौरा



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव हे गुरुवार दि. ३० जानेवारी रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार सकाळी ११ वाजता चिखली येथील गुप्त गार्डन येथे दि चिखली अर्बन विद्यानिकेतन स्कुलच्या स्नेहसंमेलन उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती, दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा वार्षिक योजना बैठकीस उपस्थिती, तद्नंतर सोईनुसार मेहकरकडे प्रस्थान करतील.

## विद्यार्थ्यांना व्यवहारीक ज्ञान मिळावे या करीता किंनगाव जट्टु जि.प.प्रा. कन्या शाळयेत अनोखा उपक्रम





दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** किंनगाव जट्टु येथील जि.प .मराठी प्राथमिक कन्या शाळा येथे बाल आनंद मेळावा साजरा करण्यात आला या बाल आनंद मेळावा साजरा करण्याचे उदिष्ट विद्यार्थ्यांना मनोरंजनातून गणीत कळावे व विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञान मिळावे हा या बाल आनंद मेळाव्याचे उदीष्ट होते या बाल आनंद मेळावा मध्ये लहान लहान मुलींनी वेगवेगळे खाद्य पदार्थ आनले व आलेले ग्राहकांशी कशाप्रकारे व्यावहार करायचा याचे ज्ञान मुख्यध्यापक पवार सर शिक्षक काकड, सर,कु.दिघेकर मॅडम,व कु. डोंगरे मॅडम यांनी दिले. याप्रसंगी गावचे सरपंच पुत्र निलेश महाजन , सदस्य अनीस खॉ पठान, पत्रकार सय्यद जहीर,शाळा समिती अध्यक्ष नारायण राऊत, उपाध्यक्ष सचिन मुळे , सदस्य तौफीक भाई, अंकुश आडे, व इतर सदस्य तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक हजर होते. विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञान मिळावे, मनोरंजनातून गणित कळावे हा या मागचा हेतू. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक पवार सर, शिक्षक काकड सर , कु.दिघेकर मॅडम व कु. डोंगरे मॅडम यांनी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच किनगाव जट्टू केंद्राचे केंद्रप्रमुख मा. गजानन कायंदे सर यांनी सुद्धा बाल मेळाव्याला भेट देऊन सर्वांना मार्गदर्शन केले.

## आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार दिंडी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** संयुक्त राष्ट्र संघटनेने २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष घोषित केले आहे व त्याचे औचित्य साधून सहकार खाते व सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्तरित्या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचे आयोजन केले आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार दिंडीचे आयोजन करण्यात आले असून ३१ जानेवारी रोजी मेहकर येथे दाखल होणार आहे.

सहकार दिंडी मेहकर शहरामध्ये दि. ३१ जानेवारी रोजी प्रवेश करणार असुन सदर दिंडी हि सोनाटी चौक-बायपास रोड लोणार कडे-कॉटन मार्केट रोड - खालचे बसस्टँड - व्यापारी लाईन -महेश अर्बन समोरील रोड - पोस्ट ऑफीस रोड - सत्यजीत अर्बन-जानेफळ चौक - गजानन महाराज मंदिर डोणगाव रोड मार्गाने जाणार आहे. सहकारी दिंडीचे तोरणे, पताका, रांगोळी, गुढी उभारुन स्वागत केले जाणार आहे, अशी माहिती सहकारी संस्थाचे सहकार निबंधक यांनी दिली.

सहकार दिडींच्या अनुषंगाने कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या सभागृहात आढावा घेऊन सहकारी दिंडीचा मार्ग निश्र्चित करण्यात आला. यावेळी सत्यजीत अर्बन को.ऑप.क्रे.सो.मेहकरचे अध्यक्ष श्यामभाऊ उमाळकर, कृषी उत्पन्न बाजार समिती मेहकर अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक माधवराव जाधव, राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे सुदर्शन भालेराव, सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती लोणार संतोष मापारी, तालुक्यातील विविध प्रकारच्या संस्थाचे अध्यक्ष, संचालक पदाधिकारी, व्यवस्थापक व कर्मचारी उपस्थित होते. ०००००

# शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे धडे

## जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्यावतीने जनजागृती, जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते झाले उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ







**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्यावतीने दि.१ ते ३१ जानेवारी या कालावधीत रस्ता सुरक्षा महिना राबविण्यात येत आहे. त्यानिमित्त जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्यावतीने बुलढाण्यातील पंकज लध्दड अभियांत्रिकी महाविद्यालयात रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान कार्यक्रम बुधवारी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे हस्ते गुरुवारी करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा विषयक प्रबोधन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक डॉ. विश्र्व पानसरे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्र्वर हिरडे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नागनाथ महाजन, पंकज लध्दड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे अध्यक्ष दिपक लध्दड कार्यक्रामास उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा विषयक मार्गदर्शन केले. या जनजागृती कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीमध्ये अग्निशमन यंत्रांच्या वापराबाबत प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

वाहन चालविताना हेल्मेटचा वापर करणे हे रस्ता सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. बहुतांशी दुचाकी वाहनाच्या अपघातामध्ये जखमी होणारे अथवा मृत पावणारे वाहनस्वार हे हेल्मेटशिवाय प्रवास करणारे असतात असे दिसून आले आहे. यादृष्टीने या कार्यक्रमात वाहनचालकांनी हेल्मेट वापरण्यासंबंधी प्रबोधनात्मक व अंमलबजावणीसंबंधी जनजागृती करण्यात आली.

## जिल्ह्याचा पालकमंत्री असल्यावर जिल्ह्यात कसे बदल होतात हे येणाऱ्या काळात दिसेल – मेघना बोर्डीकर


**परभणी/प्रतिनिधी :** परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी भाजप आमदार मेघना बोर्डीकर यांची नियुक्ती झाल्यानंतर आज प्रथमच जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न झाली या बैठकीला शिवसेना खासदार संजय जाधव यांनी मात्र अनुपस्थिती दर्शवली.



जिल्ह्याचा आमदार जेव्हा पालकमंत्री होतो तेव्हा जिल्ह्याचा कसा विकास होतो हे येणाऱ्या काळात आपल्याला कळेल जिल्ह्यात असणाऱ्या अधिकाऱ्यांना मी स्पष्टपणे सांगितले आहे की जिल्ह्याचा कारभार ढिसाळपणे चालणार नाही. जिल्ह्यातील विकास कामे लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत. जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक तसेच जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही पालकमंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या.

## दादर, ज्वारीच्या आडोश्याला गांजाची शेती पोलिसांनी केली उद्धस्त; बोरमळीपाडा शिवारातून ७६ लाखांचा मुद्देमाल जप्त





दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** दादर आणि ज्वारीच्या पिकांच्या आडोश्याला कसत असलेली गांजाची शेती शिरपूर तालुका पोलिसांनी छापा टाकून उद्धस्त केली आहे. यात दोन जणांना पकडण्यात आले असून एक जण पोलिसांच्या तावडीतून फरार झाला. पोलिसांनी टाकलेल्या या छाप्यात ७६ लाख किंमतीची गांजाची पिके जप्त करण्यात आली. ही कारवाई बोरमळीपाडा शिवारात करण्यात आली.

शिरपूर तालुक्यातील वन जमिनीवर अनेक ठिकाणी छुप्या पद्धतीने गांजाची शेती केली जाते. पोलिसांनी वेळोवेळी छापा टाकून अशी शेती नष्ट केलेली आहे. आता पुन्हा शिरपूर तालुक्यातीलच बोरमळीपाडा येथील वन जमिनीवर दादर आणि ज्वारीचे पिकांमध्ये गांजाची शेती केली जात असल्याची गोपनीय माहिती शिरपूर तालुका पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांना मिळाली. माहिती मिळताच पथकाने मंगळवारी भरदुपारी सापळा लावून छापा टाकला. त्यावेळी गांजाची शेतीजवळ तीन संशयित पोलिसांना मिळून आले. पोलिसांना पाहताच एक पळून गेला तर दोन पोलिसांच्या जाळ्यात सापडले.

याठिकणाहून पोलिसांनी ३ हजार ८०० किलो वजनाच्या गांजाची रोपे जप्त करण्यात आली असून त्याची किंमत ७६ लाख इतकी आहे. याठिकाणाहून संतोष ग्यानसिंग पावरा (वय ४१, रा. बोरमळी, ता. शिरपूर) आणि रामप्रसाद हुरजी पावरा (वय ४५, रा. भोईटी ता. शिरपूर) या दोघांना अटक करण्यात आली आहे. तर त्यांचा एक सहकारी पोलिसांच्या तावडीतून निसटून फरार झाला असल्याची माहिती पोलिसांनी यावेळी दिली.

## बिटरगाव पोलीस स्टेशन चे ठाणेदार संतोष मनवर यांची गुन्हे शाखेत वर्णी तर बिटरगाव पोलिस ठाण्याचे नवीन ठाणेदार म्हणून कैलास भगत






दैनिक आपला विदर्भ

■ महेबुब शेख

**उमरखेड :** जिल्हा पोलिस दलात प्रशासकीय कारणास्तव पोलीस अधिकार्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहे.बिटरगावचे ठाणेदार संतोष मनवर यांची स्थानिक गुन्हे शाखेत पुन्हा एन्ट्री झाली आहे तर कैलास भगत यांची बिटरगाव पोलिस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी मंगळवारी बदलीचे आदेश काढले आहे.

कैलास भगत यांना यवतमाळ जिल्ह्यातील भागाचा जास्त अनुभव असून त्यांनी महागाव, दराटी येथे सेवा दिली आहे. तसेच ते कारखाना पोफाळी पोलिस ठाण्याचे ठाणेदार होते. त्यानंतर त्यांची बदली संवेदनशील उमरखेड पोलीस ठाण्यात झाली होती . कैलास भगत अतिशय अभ्यासू व कानुन कायद्यात कर्तव्य करणारे व गुन्हेगारी होण्याच्या अगोदर गुन्हेगारीला आळा घालणारे अधिकारी असल्याची ओळख असून त्यांनी पोफाळी पोलीस ठाण्यात गुन्हेगारीचा आलेख कमी केला आहे . पोफाळी कारखाना येथे असतांना त्यांनी अवैध व्यवसाय व गुन्हेगारीवर आपला वचक निर्माण केला होता.

बिटरगाव ढाणकी पोलीस स्टेशन हे अतिशय संवेदनशील असलेल्या भागात अनुभवी व गुन्हेगारी वृत्ती वर आळा घालण्यासाठी कायद्याच्या चौकटीत गुन्हेगाराना धडा शिकवणारे,अवैध व्यवसाईक व गुन्हेगारा बद्दल कर्दनकाळ, कर्तव्यात तडजोड न करता गुन्हा खपून न घेणारे कैलास भगत यांची बिटरगावचे नवीन ठाणेदार म्हणून नियुक्ती करण्यात आली . बिटरगाव,ढाणकी व पोलिस ठाण्याच्या हद्दितिल लोकांना एक चांगले पोलिस अधिकारी मिळाले म्हणून नागरिक समाधान व्यक्त करत आहे.

# कोराडी प्रकल्पावरील १७ शेतकऱ्यांच्या मोटार वर चोरट्यांनी मारला डल्ला....

दैनिक आपला विदर्भ

■ अबुतालीब खान







**सुलतानपूर :** लाखो रुपयाचे शेतकऱ्याचे नुकसान हंगामाच्या तोंडावर अज्ञात चोरट्यांनी मेहकर तालुक्यातील शेतकऱ्यांनी सिंचनासाठी टाकलेल्या मोटार पंप चोरून नेले तसेच काही मोटर पंपा मधील तांब्याची बाहेर काढून नेऊन मोटारींची नसधूस केली. यामध्ये जवळपास १७ ते १८ शेतकऱ्यांच्या मोटार पंपांना अज्ञात चोरट्यांनी २९ डिसेंबरच्या मध्यरात्री चुना लावला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले असून, खूप मोठे नुकसान झाले आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, मेहकर तालुक्यातील बोराडी जलाशयामध्ये शेतीला पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांनी मोटार पंप टाकलेले आहेत. यातील धरणाच्या साडव्याच्या काठावरील मोटार पंप अज्ञात चोरट्याने २९ जानेवारीच्या मध्यरात्री चोरून नेले आहे. काही मोटारींची तोडफोड करून त्यामधील तांब्याची तार काढून नेली. यामध्ये रामेश्र्वर देवकर, मनोहर देवकर, गजानन जेठे, रमेश देवकर, मोहन देवकर, बद्रीनाथ देवकर, मनीष धोंडगे, दत्तात्रय देवकर, लक्ष्मण मगर, अश्रू देवकर, प्रवीण धांडे, रामकिसन राऊत, सुरेश देवकर, दिगंबर बळी, लक्ष्मण देवकर, हरिश्र्चंद्र बाबडे, रामदास देवकर आदी शेतकऱ्यांच्या मोटारींची नासधूस मोटार मधील तांब्याची तार काढून नेल्यामुळे खूप मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे लवकरात लवकर या अज्ञात चोरट्यांचा शोध घ्यावा अशा प्रकारची मागणी शेतकरी वर्गाने केली आहे. या चोरट्यांचा शोध घेण्याचे आवाहन मेहकर पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. आता ठाणेदार भाऊरावजी घुगे या चोरट्यांचा शोध लावतील का? की, अगोदर ही अशा घटना घडली आहे. शेतकऱ्यांनी तक्रारी दाखल केल्या परंतु त्या दोन दिवसापुरता तपास केला आणि त्यानंतर पुन्हा प्रकरण थंडावले अजूनही अगोदर येईल चोरट्यांचा शोध लागला नाही. की, पोलीस या चोरट्यांचा शोध घेण्यासाठी कमी पडले. का पोलिसांचा हात यामध्ये आहे अशा प्रकारची चर्चा शेतकरी वर्गात होत आहे.

मी सुद्धा एक शेतकऱ्याचा मुलगा आहे. मला याची संपूर्ण जाणीव असून, या अज्ञात चोरट्यांचा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच शोध घेऊन त्यांच्या मुसक्या आवळू. जर कोणाला कोणावर काही संशय असेल तर शेतकऱ्यांनी आम्हाला सांगावे.

**-भाऊरावजी घुगे**
**ठाणेदार मेहकर पोलीस स्टेशन असे म्हंटले आहे**